# वर्ग - एस. वाय. बी. ए. मराठी जनरल (G 2)

# विषयाचे नाव - भाषिक कौशल्य विकास आणि आधुनिक मराठी साहित्यप्रकार : कादंबरी

## घटक अ) - १) संगणक आणि मोबाईलवर युनिकोडमधून मराठी मुद्रण

### १. युनिकोड म्हणजे काय ?

युनिकोड म्हणजे लिपीचिन्हांचे प्रमाणीकरण. हे प्रमाणीकरण जागतिक पातळीवर करण्यात आले असल्यामुळे, संगणकावर टंकलिखित केलेले जगभरातील दुसऱ्या कोणत्याही संगणकावर वाचता येऊ शकते. हा या तंत्रज्ञानाचा, प्रणालीचा सर्वात मोठा फायदा आहे. शिवाय युनिकोड म्हणजे विविध प्रादेशिक भाषांसाठीचा font आणि कळफलकाची सर्वमान्य प्रणाली. यामध्ये मराठीसह विविध देशातील शेकडो भाषांचा समावेश आहे सध्या सर्व प्रमुख भारतीय व अधिकृत अशा २२ भाषा युनिकोडमध्ये उपलब्ध आहेत. मराठी यूनिकोड हा अलिकडच्या काही वर्षातील संगणकावर वापरण्याचा समर्थ पर्याय उपलब्ध आहे. परंतु तो अजूनही मोठ्या प्रमाणात रूळलेला नाही म्हणून मराठीच्या संगणकीय अभिव्यक्तीसाठी मराठीच्या युनिकोडच्या प्रसाराची गरज आहे इतिहासात मराठी भाषेने जसे मोडीलिपीला बाजूला सारून काळानुरूप देवनागरी लिपी धारण केली त्याप्रमाणे आता संगणक युगात मराठीने युनिकोड धारण करण्याची गरज आहे ही प्रक्रिया जेवढ्या वेगाने होईल, तेवढा मराठी बाबतचा संगणकीय सावळागोंधळ संपेल, असे मला वाटते.

आपल्या संगणकावर आणि मोबाईलवर ‘गुगल इंडिका कीबोर्ड डाऊनलोड करून घेतल्यास अत्यंत सफाईदारपणे फोनेटिक पद्धतीने मराठीत 'अ' साठी A, 'ब' साठी B असे मराठी लिहिता

येते. आज अनेकजण त्याचा सर्रास वापर करीत आहेत. तरीही ग्रामीण भागातील परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. त्यामुळे युनिकोडच्या वापराची गरज ओळखणे महत्त्वाचेआहे.

**२. युनिकोडच्या वापराची आवश्यकता -**

पूर्वीपासून ज्यांना संगणकावर मराठी वापरायचे आहे त्यांना संगणकीय आज्ञावली अर्थात सॉफ्टवेअर विकत घ्यावे लागते. म्हणजेच संगणकासाठी इंग्रजी मोफत आणि मराठी विकत घ्यावी लागते. उदा. श्रीलिपी. थोडक्यात अभिजात मराठीचा दावा करण्याचा आणि 'अमृतातेही पैंजा जिंके' असे सांगणाऱ्या मातृभाषेला बाजारातून विकत घ्यावे लागते हे भयानक वास्तव आहे. तसे नाही केले तर संगणकावर आतल्याआत भागवाभागवी करायला शिवाजी, कृतीदेव, आकृती, APS, IMS असे Font आहेतच ! परंतु हे Font एका ठिकाणी टंकलेखनापुरतेच मर्यादित आहेत या Fontचे इंटरनेटची बहुदा जुळत नाही या Fontमध्ये मराठी टंकलेखन करून, जेव्हा आपण ते दुसऱ्यांना E-Mail ने पाठवतो; तेव्हा त्यांच्या संगणकात तेFont नसतील तर अक्षरशः एक अक्षरही वाचता येत नाही. मग हे Font इंटरनेटवरून शोधावे लागतात. ते कंट्रोल पॅनल मधील फॉन्ट फोल्डर मध्ये ठेवावे लागतात; तेव्हा ती माहिती उपलब्ध होते. हे Font इंटरनेटवर उपलब्ध नसतील, इंटरनेट नसेल, त्यासाठी पुरेशी रेंज नसेल, त्यासाठी पुरेसा बॅलन्स नसेल किंवा ती व्यक्ती घाईगडबडीत असेल तर अशावेळी पश्चाताप केल्याशिवाय हाती काहीच उरत नाही. ऐनवेळी फजिती होते; हे अनेकांनी अनुभवले आहे त्यासाठी PDF स्वरूपात त्या फाईल पाठवणे; हा दुसरा पर्याय असतो पण अशा PDF स्वरूपातील फाईल ह्या बाकीच्यांना बदलता येत नाही. जर त्यांच्याकडे त्यांची डॉक्युमेंट फाईलची मूळ प्र्रत असेल तर ही त्याची मर्यादाही असते. अर्थात अशा वेळी अशा प्रकारच्या PDF फाईल करून पाठवणे, जमतेच असेही नाही. म्हणून हा सर्व खटाटोप बंद करून त्याऐवजी कमीत कमी वेळेत विनासायास आणि विनाव्यत्यय प्रत्येकाला आपापल्या सोयीने टंकलेखन करता यावे, ज्याला हव्या त्या ठिकाणी हवी ती



SDSHRM

माहिती पाठविता यावी, माहितीची देवाणघेवाण करता यावी आणि अगोदरच समृद्ध असलेल्या मराठी मातृभाषेच्या ठेवा अधिकच संपन्न करून तो आत्मसात करण्यासाठी तांत्रिक मदत व्हावी ही युनिकोड वापराची सर्वात महत्त्वाची गरज आहे.

अनेक शतकांपासून चालत आलेली मोडीलिपीबाजूला सारून कालानुरूप मराठी भाषेचे स्वरूप बदलले गेले व त्यामुळेच देवनागरी लिपी अस्तित्वात आली त्याचप्रमाणे आता जागतिकीकरणाच्या युगात, संगणकयुगात मराठीने युनिकोड धारण करणे गरजेचे आहे असे झाल्यास संगणक आणि मोबाईलवर मराठी टंकलेखनाची गैरसोय निश्चितच दूर होईल. कारण माहितीतंत्रज्ञान युगात देश पातळीवर नव्हे तर जागतिक पातळीवर घोडदौड करणाऱ्या मराठीला वेगवान स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी, एकमेव मार्ग म्हणजे मराठी युनिकोडचा वापर करणे लिपीचिन्हांचे प्रमाणीकरण जागतिक पातळीवर करण्यात आल्यामुळे संगणकावर टंकलिखित करण्यात आलेली माहिती जगभरातील दुसऱ्या कोणत्याही संगणकावर पाहता, वाचता येऊ शकते. हा या तंत्रज्ञानाचा सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणता येईल येईल.

पूर्वीची ८ अंकांवर अक्षरचिन्ह ठरविण्याची पद्धत इंग्रजी भाषेसाठी पुरेशी होती मात्र जगातील सर्व भाषांमधील अक्षरचिन्ह दर्शविण्यासाठी ती योग्य नव्हती. ही अडचण दूर करण्यासाठी ३२ अंकांवर आधारित युनिकोड या लिपीसंचाची निर्मिती करण्यात आली यास आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त झाली. मायक्रोसॉफ्ट आणि गुगल सारख्या संस्थांनी आज युनिकोडचे संच स्वीकारले आहेत.

श्री ओंकार जोशी यांनीकोणत्याही ब्राऊजरमधे वापरता येईल अशी गमभन नावाची संगणक प्रणाली विकसित केली असून ती http://httpwww.var-x.com/ गमभन या संकेतस्थळावर सर्वांसाठी मोफत ठेवली आहे. भारत सरकारच्या सी-डॅक या संस्थेने युनिकोड आधारित मोफत Font सर्वसामान्यांसाठी इंटरनेटवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध केले आहेत. अनेक खाजगी

वेबसाईटवर देखील असे Font उपलब्ध करून दिले आहेत. गमभन आणि ही नवीन संकेतस्थळे फोनेटिक असल्याने कोणासही त्याचा वापर करून सहज मराठी लिहिता येते.

युनिकोडचा आणखीन एक महत्त्वाचा फायदा म्हणजे लिप्यांतर किंवा एका लिपीत वाचणे. उदा. गुजराती मजकूर देवनागरीत सहज वाचू शकतो ज्यांना गुजराती समजते पण लिपी वाचता येत नाही, त्यांना 'आजचा गुजराती समाचार' वर्तमानपत्र किंवा गुजराती Blog देवनागरीत वाचता येईल. म्हणजेच एका लेखाचे दुसऱ्या लिपीत रूपांतर होऊ शकते दिवसेंदिवस तंत्रज्ञान प्रगत होऊ लागले आहे. भविष्यात भाषांतराची सोय देखील संगणकाकरवी सुलभ होऊ शकेल.ब्राऊझरच्या नव्या आवृत्त्यांमध्ये युनिकोडच्या सुविधेचा समावेश केलेला आहे

गुगल, याहू यासारख्या शोधयंत्राने युनिकोडचा स्वीकार केल्याने मराठी संकेतस्थळावरील माहितीचा शोध अशा शोधयंत्रावर घेणे सोपे झाले आहे जगातील सर्व भाषांवरील एकच अक्षरसंच वापरणाऱ्या युनिकोड तंत्रज्ञानाचा वापर केल्यास भाषा व लिपी यांच्या विविधतेमुळे येणाऱ्या अडचणी दूर होऊ शकतात, हेच तंत्र वापरून व त्या तंत्रावर आधारलेले टाईप (type) आपल्या संकेतस्थळावर वापरून आज लोकसत्तासह अनेक वृत्तपत्रांची संकेतस्थळे तयार झाली आहेत

रेडिफमेल, मेल, जीमेल, या संपर्क संकेतस्थळांनी तसेच आर्कुड, याहू यासारख्या व्यासपीठांनी देखील मराठी भाषेसह अन्य भाषांच्या वापराची सुविधा उपलब्ध करून दिली आहे जगभरात पसरलेल्या हजारो मराठी तरुण हे Font वापरून आर्कुडसारख्या संकेतस्थळावर मराठीतून गप्पागोष्टी करीत आहेत. नव्या पिढीतील शेकडो तरूणांनी युनिकोडचा वापर करून मराठी ब्लॉग वर विविध विषयांसाठी लेखन केले आहे

सध्या अस्तित्वात असणाऱ्या संकेतस्थळांचे युनिकोडमध्ये रूपांतर करण्याचे काम चालूअसून 'माय मराठी डॉट कॉम' हे संकेतस्थळ युनिकोडमध्ये रूपांतरित केले आहे सर्व साहित्यिकांनी या



SDSHRM

संकेतस्थळाचा स्वीकार केल्यास, त्यांचे साहित्य अत्यंत कमी खर्चात सर्व जगात प्रकाशित होऊ शकेल हा विचार सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी '७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सांगली या संकेतस्थळाची युनिकोडमध्ये निर्मिती केली आहे

**३. संगणकावर युनिकोड मधून मराठी मुद्रण-**

संगणकावर मराठी मुद्रण करण्यासाठी गुगल क्रोम, ब्राऊझरमध्ये गूगल इनपुट टूल्स नावाचे एक्सटेन्शन आहे. ते स्थापित करून मराठी मुद्रण करता येऊ शकते. त्यासाठी सर्वप्रथम 'गूगल इनपुट टूल डाऊनलोड करावे लागेल. त्यानंतर ते उघडल्यानंतर क्रोम एक्सटेन्शन डाऊनलोड करून त्यावर क्लिक करावे लागेल. त्यानंतर ते इन्स्टॉल झाल्यावर सर्व प्रकारच्या भारतीय भाषा तुम्हाला दिसतील गुगल क्रोम एक्सटेन्शन क्रोमवर गेल्यानंतर मराठी भाषा निवडली की तुमच्या संगणकावर मराठी टायपिंग सहज करता येईल. तुम्ही 'पुस्तके' हा शब्द टाईप करून इच्छित असल्यास ते इंग्रजीत pustake असे लिहावे. ते मराठीत रूपांतरित होईल. हा मजकूर कॉपी करून तुम्ही आवश्यक त्या ठिकाणी पेस्ट करू शकता.

**४. मोबाईलवर युनिकोडमध्ये मराठी मुद्रण** –

मोबाईलवर मराठी टाईप करण्यासाठी अँड्रॉइड फोनमध्ये गुगल प्लेस्टोअरवर आणि आयफोनसाठी ॲपस्टोअरमध्ये विविध ॲप उपलब्ध आहेत. त्या माध्यमातून युनिकोड म्हणजेच मंगल fontमध्ये टायपिंग होत असल्यामुळे तो कोणालाही कुठेही वाचता येऊ शकतो. अँड्रॉइड फोनवर मराठी टायपिंग करण्यासाठी 'गुगल इंडिक कीबोर्ड हे अधिकृत ॲप गुगलने विकसित केलेले आहे. गुगल प्ले स्टोअर मध्ये गुगल इंडिक कीबोर्ड हे ॲप इन्स्टॉल करा इन्स्टॉल केलेले ॲप उघडा. ओपन करा. त्यात तुम्हाला हे कीबोर्ड म्हणून सेट करता येईल. त्या पर्यायची निवड करा. त्यानंतर जेव्हा तुम्ही टाईप करण्यासाठी कीबोर्डवरती येईल तेव्हा कीबोर्डवर किंवा दुसऱ्या देवनागरी अक्षराची टॅब दिसेल त्यातून मराठी भाषा



SDSHRM

निवडा. आता तुम्ही ‘पुस्तक’ कसे टाईप केल्यास ते पुस्तक असे मराठी टाईप झालेले असेल याशिवाय गुगल प्लेस्टोअरमध्ये मराठी कीबोर्ड असे शोधल्यास मराठी टाईप करण्यासाठीच्या ॲपचे अनेक पर्याय तुमच्या समोर येतील. अशा प्रकारे संगणक आणि मोबाईलवर युनिकोडमधून मराठी मुद्रणकरता येईल.

---

SDS HRM